**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथामजला) सर्व्हे नं. ८३२ ए.भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे ४११००४
दूरध्वनी क्र.: 020 -29709617 वेबसाईट :- mscepune.in ई-मेल :-www.mscegcctbc@gmail.com

जा.क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा/२०२६/ 2788
दिनांक :- 07 /०७/२०२६.

# प्रसिध्दीपत्र

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -०१ यांचे मार्फत मराठी, हिंदी ३०, ४० व इंग्रजी ३०, ४०, ५० व ६० श.प्र.मि. या विषयाची शासकीय टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) दि. ०२/०७/२०२६ ते दि. २०/०७/२०२६ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने राज्यभरातील एकुण २०९ परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे.

मराठी व हिंदी ३०, ४० श.प्र.मि. टायपिंग परीक्षेतील विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर संस्था लॉगीनव्दारे दि. ०१/०७/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे.

१. संबंधित टायपिंग संस्थाचालकांनी त्यांच्या संस्थेतील सर्व परीक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन त्यावर विद्यार्थ्यांचा अद्ययावत फोटो चिकटवून या फोटोवर संस्थेचा शिक्का व स्वाक्षरीसह संबंधित परिक्षार्थ्यांना त्वरीत प्रवेशपत्र वितरीत करावीत. **फोटोवर सही व शिक्का करताना अर्धी सही व शिक्का चिकटवलेल्या फोटोवर येणे आवश्यक आहे.**

२. प्रवेशपत्रातील दुरुस्तीकरीता यापूर्वीच संधी देण्यात आलेली असल्यामुळे विद्यार्थ्याचे नाव, अडनाव, वडिलांचे नाव/ पतीचे नाव, आईचे नाव, विषय बदल,फोटो बदल इ. कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करुन दिली जाणार नाही.

३. परीक्षा परिषदेकडून विद्यार्थी हित लक्षात घेता सदर परीक्षेत प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांना **गरजेनुसार बॅच बदल देण्यात येत आहे. बॅच बदलासाठी संस्था लॉगीनव्दारे सशुल्क लिंक दि. ०२/०७/२०२६ दुपारी १२:०० पासून ते दि. ०४/०७/२०२६ रात्री ११ :५९ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. प्रति विद्यार्थी प्रति विषय बॅच बदलाचे शुल्क रु. १००/- राहील.**

प्राप्त झालेल्या अर्जावर त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी संबंधित संस्थेच्या लॉगीनव्दारे नविन बॅच बाबतचे प्रवेशपत्र निर्गमित करण्यात येतील तसेच निश्चित केलेल्या केंद्रांतर्गतच बॅच बदल अनुज्ञेय राहील.

४. **परीक्षा परिषदेकडून संस्थांना पुरविण्यात आलेल्या लिंकव्दारेच विहित कालावधीत प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येईल, ई-मेलव्दारे अथवा अन्य कोणत्याही माध्यमातून प्राप्त अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच केंद्रावरील उपलब्धतेनुसारच बॅच बदल देण्यात येईल. परीक्षा केंद्रावर संभाव्य जागा उपलब्ध नसल्यास बॅच बदल देणे शक्य होणार नाही. याबाबत सर्व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.**

५. विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या वेळेच्या ३० मिनिटे आधी परीक्षा केंद्रावर हजर रहावे. सुरुवातीला विद्यार्थ्यांचे ओळखपत्र तपासणे चढत्या क्रमाने विद्यार्थ्यांना बसविणे व हजेरी पटावर स्वाक्षरी घेणे इ. कामे करण्यात येतील. त्यानंतर विद्यार्थ्यांना ३ मिनिटांचा सराव उतारा (Trail Passage) सोडवावयाचा आहे. या Trail Passage कोणत्याही प्रकारचे गुण देण्यात येणार नाहीत. परीक्षा सुरु होण्यापुर्वी ४ मिनिट आधी Trail Passage ची लिंक बंद करण्यात येईल. म्हणजेच विद्यार्थ्याला बॅचच्या वेळेच्या आधी सकाळी ८:३० ते ८:५६, १०:३५ ते १०:५६, दुपारी १२:४५ ते १:११, २:५० ते ३:११ आणि ४:५० ते ५:११ या वेळेतच सराव उताऱ्याचे (Practice Passage) टायपिंग करता येईल.

६. पहिल्या सत्रामध्ये बरोबर ९ AM वाजता, दुसऱ्या सत्रामध्ये ११ AM वाजता, तिसऱ्या सत्रामध्ये १:१५ AM वाजता व चौथ्या सत्रामध्ये ३: १५ AM वाजता परीक्षेला सुरुवात होईल. जर विद्यार्थी परीक्षा केंद्रावर उशीरा आला तर तेवढा वेळ त्याचे वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या वेळेमधून कमी करण्यात येईल. उदा. सकाळी ९:०० AM वाजता परीक्षेला सुरुवात झाली व विद्यार्थी ९:०५ AM वाजता हजर झाला तर त्याच्या एकूण वस्तुनिष्ठ प्रश्नांसाठी देय असलेल्या २५ मिनिटांमधून ५ मिनिटांचा वेळ आपोआपच कमी करण्यात येईल व पर्यायाने त्याला वस्तुनिष्ठ प्रश्न सोडविण्यासाठी केवळ २० मिनिटे मिळतील. परीक्षा सुरु झाल्यापासून ०५ मिनिटांनंतर कोणालाही परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येणार नाही. याची नोंद सर्व संस्थाचालकांनी व विद्यार्थ्यांनी घ्यावयाची आहे.



Scanned with OKEN Scanner

७. परीक्षेला सुरुवातीलाच ५ मिनिटे अनिवार्य असलेला ई-मेल विभाग, त्यानंतर गतीउतारा (Speed Passage) तक्ता, पत्र व शेवटी वस्तुनिष्ठ (Objective) प्रश्नांचा विभाग असे क्रमाक्रमाने संगणकावर सोडवयाचे आहे. गती उतारा (Speed Passage) सुरु होण्यापूर्वी ३० सेकंदांचा काऊंटडाऊन टायमर स्क्रीनवर दिसेल. या ३० सेकंदांच्या कालावधीत गती उतारा टाईप करता येणार नाही. ३० सेकंद पुर्ण झाल्यानंतर Speed Passage चा ७ मिनिटांचा टायमर सुरु होईल व ७ मिनिटांमध्ये विद्यार्थ्यांनी आपला गती उतारा पुर्ण करावयचा आहे.

८. सदर परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी उमेदवारांनी प्रवेशपत्र आणणे आवश्यक आहे. तसेच प्रवेशपत्रासोबत एक मूळ फोटो असलेले ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, मतदान ओळखपत्र, शाळा महाविद्यालय ओळखपत्र इत्यादी.

**(महेश चोथे)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे -०४.**

JAN-2026